MHST140024792022

दाखल करण्याची तारीख–१३.१०.२०२२
नोंद केल्याची तारीख – १७.१०.२०२२
निर्णय देण्याची तारीख –१९.०५.२०२६
कालावधी – ०३ वर्षे, ०७ महिने, ०६ दिवस

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, फलटण, जि. सातारा यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल)

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.११५०/२०२२</u>** **<u>नि.क्र.५१</u>**

*१३८ परक्राम्य लेख अधिनियम १८८१ अंतर्गत*

**<u>फिर्यादी पक्ष</u>** : **श्री.दत्तात्रय सखाराम भोसले**
वय – ४० वर्ष, व्यवसाय – नोकरी
रा.सरडे, ता. फलटण, जि. सातारा

**<u>विधीज्ञ</u>** : श्री. यु.व्ही.कदम

**<u>विरुध्द</u>**

**<u>आरोपी</u>** : **श्री. सुरेश माणिक मोरे**
वय – ५० वर्ष, व्यवसाय– शेती
रा. सरडे, ता. फलटण, जि. सातारा

**<u>विधीज्ञ</u>** : श्री.बी.एस.जाधव

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | : | ३०.०९.२०२२ |
| फिर्यादीने आरोपीला पाठविलेल्या नोटीशीची तारीख | : | ०२.०९.२०२२ |
| आरोपीला नोटीस पोहोच पावतीवरुन मिळाल्याची तारीख | : | १४.०९.२०२२ |
| आरोपीचे प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | : | १०.११.२०२३ |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | : | १६.१२.२०२३ |
| न्यायानिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | : | १९.०५.२०२६ |
| न्यायानिर्णयाची तारीख | : | १९.०५.२०२६ |
| न्यायानिर्णय काय | : | आरोपीस दोषी धरण्यात येत आहे. |

**<u>आरोपीची माहितीः</u>–**

| आरोपीचे नाव | आरोपीस अटक केल्याची तारीख | आरोपीस जामिनावर सोडल्याची तारीख | दोषारोप कलम | शिक्षा किंवा निर्दोष मुक्तता | शिक्षा काय | खटला चालु असतांना आरोपी जेलमध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| सुरेश माणिक मोरे | – | १८.१०. २०२३ | १३८ परक्राम्य लेख अधिनियम | आरोपीस दोषी धरण्यात येत आहे. | अंतिम आदेशाप्रमाणे | नाही. |

**<u>न्यायनिर्णय</u>**

(दिनांक १९.०५.२०२६ रोजी अधिघोषीत)

आरोपीविरूध्द परक्राम्य लेख अधिनियम कलम १३८ प्रमाणे दोषारोप ठेवून खटला चालविण्यात आला.

२. **फिर्यादीचे थोडक्यात कथन की –**

फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील राहणार असल्याने त्यांची पूर्वीपासून ओळख आहे. फिर्यादी हे ग्रामपंचायत सरडे येथील माजी सरपंच असुन सध्या विद्यमान ग्रामपंचायत सदस्य आहेत व मठाचीवाडी येथे शिक्षक म्हणून नोकरीस आहेत. आरोपीस आर्थिक रक्कमेची कौटुंबिक अडचण निर्माण झाल्याने आरोपीन रक्कम रु.२,२५,०००/– हातउसणे म्हणून फिर्यादी यांचेकडे मागणी केली. फिर्यादी व आरोपी यांची पूर्वीपासूनची ओळख असल्याने आरोपीची आर्थिक अडचण लक्षात घेता आरोपीस हातउसने रक्कम देणेची फिर्यादी यांनी तयारी दर्शवली. फिर्यादी यांचेकडे त्यावेळी एवढी मोठी रक्कम उपलब्ध नसल्याने आरोपीस हातउसने देण्याचे उद्देशाने फिर्यादी यांनी पुणे विभागीय शिक्षक व शिक्षकेतर पतसंस्था या संस्थेत फिर्यादी सभासद असल्याने, दि.०७.०९.२०२० रोजी रक्कम रु५,००,०००/– एवढे कर्ज प्रकरण मंजूर करुन घेतले. सदर रक्कम फिर्यादी यांचे सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा गुणवरे या खात्यामध्ये जमा झाले. सदरची कर्ज रक्कम जमा झालेनंतर दि.०९.०९.२०२० रोजी फिर्यादी यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा फलटण येथे आरोपीच्या खात्यावरती आर.टी.जी.एस. द्वारे रक्कम रु.२,००,०००/– केली व त्याचदिवशी रोख स्वरुपात रक्कम रु.२५,०००/– असे एकुण रक्कम रु.२,२५,०००/– आरोपीस एक महिने कालावधीकरीता हातउसने दिले. एक महिना पूर्ण झालेनंतर फिर्यादी यांनी आरोपीस हातउसने दिलेल्या रक्कमेची मागणी केली असता, आरोपी यांनी टाळाटाळ करून उडवाउडवीची उत्तरे दिलीत. फिर्यादी यांनी वेळोवेळी समक्ष भेटून व फोनव्दारे हातउसने दिलेल्या रक्कमेची मागणी केली असता, आरोपीने दि. ९/७/२०२२ रोजी सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा फलटण क्रॉस चेक क्र. ०३६५४९

दि.९/७/२०२२ रोजीचा रक्कम रु. २,२५,०००/– चा खाते क्र. ३९०८१८४२८१ दिला व चेक देतेवेळी आरोपी यांनी फिर्यादीस चेक वटणेची हमी व ग्वाही दिली.

३. फिर्यादी पुढे कथन करतात की, आरोपीने दिलेल्या हमी व ग्वाहीच्या आधारे फिर्यादी यांनी सदरचा चेक वटणेकामी दि. २३/०७/२०२२ रोजी फिर्यादी यांनी त्यांचे खाते असणारी सातारा जिल्हा मध्यमवर्ती बँक खाते नं. १०४१०२६०९०००० या खात्यामध्ये वटण्यासाठी जमा केला असता, प्रस्तुत चेक न वटता Funds Insufficient असा शेरा मारुन रिटर्न मेमोरसह परत आला. सदर बँकेने दि. ३०/०७/२०२२ चे पत्राने फिर्यादी यांना कळविले व फिर्यादी यांना चेक रक्कम मिळाली नाही. सदर बाब फिर्यादी यांनी आरोपी कळविली असता, आरोपीने नमुद चेक पुन्हा वटण्यासाठी सादर करणेस सांगितले. आरोपीवरती विश्वास ठेवून फिर्यादी यांनी नमुद चेक पुन्हा वटणेकामी सादर केला असता दि. ०६/०८/२०२२ रोजी Funds Insufficient असा शेरा मारुन न वटता पुन्हा परत आला. बँकेने दि.०६/०८/२०२२ चे पत्राने कळविले. सदरची बाब पुन्हा फिर्यादी यांनी आरोपीस कळविली असता, सदरचा चेक पुन्हा आरोपी यांनी नमुद बँकेत भरणे सांगितला व पुन्हा एकदा दि. १२.०८.२०२२ रोजी नमुद चेक न वटता परत आला. सदर बाब बँकेने दि.२३.०८.२०२२ चे पत्राने फिर्यादीस कळविले व फिर्यादी यांना चेकची रक्कम मिळाली नाही. त्यामुळे, फिर्यादीने त्यांचे वकिलांमार्फत दि.०२.०९.२०२२ रोजी रजिस्टर पोस्टाने कायदेशीर असलेली रक्कम मागणी नोटीस पाठवून नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांत सदर कायदेशीर देय असलेल्या चेकच्या रक्कमेची मागणी केली. सदर नोटीस आरोपीस दि.१४.०९.२०२२ रोजी मिळूनदेखील आरोपीने १५ दिवसांत म्हणजे दि.२९.०९.२०२२ पर्यंत धनादेशामध्ये नमूद केलेली रक्कम दिली नाही. सबब, फिर्यादीने आरोपीविरुध्द सदरची फिर्याद दाखल केली आहे.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी फिर्यादीचे प्रतिज्ञालेख नोंदवुन आरोपीविरूध्द दिनांक २९.०८.२०२३ रोजी परक्राम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वये समन्स काढण्याचे आदेश दिले. आरोपी दिनांक १८.१०.२०२३ रोजी हजर झाला व माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरूध्द दि.१०.११.२०२३ रोजी प्रतिकथन नि.१५ नोंदविला. तो आरोपीस त्याच्या मातृभाषेत वाचुन व समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा नाकबुल केल्याने सदर केस पुढे चालविण्यात आली.

५. माझे पूर्वाधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)( ब) नुसार नि.क्र.४२ प्रमाणे आरोपीचे निवेदन नोंदविले. त्यामध्ये आरोपीने त्याच्याविरुध्द खोटी केस केली आहे असा बचाव घेतला आहे.

६. फिर्यादीतर्फे विद्वान वकील श्री.यु.व्ही.कदम व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.बी.एस.जाधव यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. फिर्यादी त्यांचे कथनाप्रित्यर्थ खालील न्यायनिवाड्यांवर विसंबून राहिले आहेत. सदर न्यायनिवाडयांमधील न्यायतत्वे मी विचारात घेतली आहेत.

१. मा. सर्वोच्च न्यायालय, भारत यांचेकडील **Kishan Rao V/s. Shankargouda, Criminal Appeal No.803 of 2018, decided on July 2, 2018**

२. मा. सर्वोच्च न्यायालय, भारत यांचेकडील **Rohitbhai Jivanlal Patel V/s. State of Gujarat and another, Criminal Appeal No.508 of 2019, decided on 15th March, 2019.**

३. मा. सर्वोच्च न्यायालय, भारत यांचेकडील **Vijay Gopala Lohar V/s. Pandurang Ramchandra Ghorpade and another, Criminal Appeal Nos.607-608 of 2019, decided on 5th April, 2019.**

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील **The Dharampeth Mahil Urban Credit Co-operative Society Limited, Nagpur V/s. Rambahadur s/o Brijmohan Yadav and another, Cril. Appeal No.292 of 2017, decided on 16th August, 2018.**

५. मा. हिमाचल प्रदेश उच्च न्यायालय यांचेकडील **Pushap raj V/s. Ramdhan, Criminal Revision No.1 of 2016, decided on 28th December, 2016.**

७. आरोपी त्यांचे कथनाप्रित्यर्थ मा. सर्वोच्च न्यायालय, भारत यांचेकडील **Anvar P. V. Vs. P. K. Basheer, (2014) 10 SCC 473** या न्यायनिवाडयांवर विसंबून राहिले आहेत. सदर न्यायनिवाड्यामधील न्यायतत्वे मी विचारात घेतली आहेत.

८. समोर आलेला लेखी व कागदोपत्री पुरावा यांचा सर्वकष विचार केल्यावर खालील मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्दयावर मी नोंदविलले निष्कर्ष कारणासहित खालीलप्रमाणे नमुद केलेला आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | आरोपीने सदर कायद्या अंतर्गत फिर्यादीच्या बाजुने असलेले सदर गृहितके खोडून काढली आहेत काय? | **..नाही..** |
| **२.** | फिर्यादीने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीला त्याने विहित नोटीस पाठवुन धनादेशातील रक्कमेची मागणी केली व नोटीस मिळूनही आरोपीने सदर रक्कमेची परतफेड केली नाही? | **..होय..** |
| **३.** | आरोपीने सदर कायदा, कलम १३८ अंतर्गत गुन्हा केलेला आहे काय? | **..होय..** |
| **४.** | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमीमांसा

९. फिर्यादी पक्षाने आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी खालीलप्रमाणे साक्षीदार तपासले आहेतः–

| **सा.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्रमांक** | **साक्षीदाराचा प्रकार** |
|---|---|---|---|
| १. | दत्तात्रय सखाराम भोसले | १७ | फिर्यादी |
| २. | योगिता शिवाजी साळुंखे | ३५ | शाखा प्रमुख |

१०. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदारः–

| **अ.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदाराचा प्रकार** |
|---|---|---|
| | **काही नाही** | |

११. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदारः–

| **अ.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदाराचा प्रकार** |
|---|---|---|
| | **काही नाही** | |

१२. फिर्यादी पक्षाने आरोपीविरुध्दचे दोष सिध्द करण्याकरीता खालील कागदपत्रांवर आपली भिस्त ठेवली आहे.

| **अ. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे विवरण** | **कोणी सिध्द/शाबीत केले** |
|---|---|---|---|
| १. | २३ | वादातीत धनादेश | साक्षीदार क्र.१ |
| २. | २४ | दि.२६.०७.२०२२ चा चेक रिटर्न मेमो | साक्षीदार क्र.१ |
| ३. | २५ | दि.३०.०७.२०२२ चे बँकेचे कव्हरिंग लेटर | साक्षीदार क्र.१ |
| ४. | २६ | दि.०४.०८.२०२२ चा चेक रिटर्न मेमो | साक्षीदार क्र.१ |
| ५. | २७ | दि.०६.०८.२०२२ चे बँकेचे कव्हरिंग लेटर | साक्षीदार क्र.१ |
| ६. | २८ | दि.१२.०८.२०२२ चा चेक रिटर्न मेमो | साक्षीदार क्र.१ |
| ७. | २९ | दि.२३.०८.२०२२ चे बँकेचे कव्हरिंग लेटर | साक्षीदार क्र.१ |
| ८. | ३० | नोटीस स्थळप्रत | साक्षीदार क्र.१ |
| ९. | ३१ | आर.पी.ए.डी.पावती व पोस्ट ट्रॅकिंग रिपोर्ट | साक्षीदार क्र.१ |
| १०. | ३६ | आर.टी.जी.एस.फॉर्म पडताळणी प्रत | साक्षीदार क्र.२ |
| ११. | ३७ | पैसे काढून घेण्याची स्लीप | साक्षीदार क्र.२ |
| १३. | ३८ | फिर्यादीचे बँक खात्याचे अकाऊंट स्टेटमेंट | साक्षीदार क्र.२ |

१३. आरोपीचे विद्वान विधीज्ञ यांनी साक्षीदारांच्या उलटतपासात सिध्द झालेली/निशाणी क्रमांक देण्यात आलेली कागदपत्रेः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे विवरण |
|---|---|---|
| | काही नाही | |

१४. फिर्यादिने नि.३६ अन्वये व आरोपीने नि.४० अन्वये त्यांचा पुरावा संपल्याची पुरसीस दाखल केली आहे.

**दोन्ही पक्षांना मान्य असलेली परिस्थीती :–**

१५. आरोपी व फिर्यादी हे एकाच गावातले राहणारे असल्याने त्यांची पूर्वीपासून ओळख आहे. वादातीत धनादेश हा आरोपीच्या खात्यातील आहे. त्यावर आरोपीची सही आहे. फिर्यादी मठाचीवाडी विद्यालय येथे लिपीक म्हणून काम करतो. त्याला दरमहा रु.५०,०००/– पगार मिळतो. फिर्यादीच्या घरामध्ये फिर्यादी, त्याची पत्नी, दोन मुले व वडील असे आहेत. त्या सर्वांची जबाबदारी त्यांच्यावर आहे. सर्व कपात केल्यानंतर फिर्यादीच्या हातामध्ये रु.३५,०००/– दरमहा राशी येते.

**मुद्दा क्र.१ करीता :–**

१६. फिर्यादीने त्याच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात फिर्यादीतील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. फिर्यादीने त्याच्या उलटतपासामध्ये सरडे ग्रामपंचायतमध्ये ते गेल्या १० वर्षापासुन सदस्य आहे, त्यांच्यावर एक फौजदारी खटला झाला होता व तो खटला फलटण न्यायालयामध्ये प्रलंबीत आहे, आरोपीची बरड या गावी ११ गुंठे जमीन आहे किंवा कसे हे त्यांना माहित नाही, त्यांना आरोपीने दिनांक ०९/०६/२०२० रोजी मागणी केली होती, त्यांनी आरोपीकडून उसनवार पावती बनवुन घेतली नव्हती, दिनांक ०९/०९/२०२० ते दिनांक ०९/०९/२०२२ पर्यंत तब्बल दोन वर्ष त्यांनी आरोपीला पैशाच्या मागणीकरीता कोणतीही लेखी नोटीस दिली नव्हती, त्यांनी त्या कालावधीमध्ये आरोपी विरुध्द पोलीस तक्रार केली नव्हती, या बाबी मान्य केल्या आहेत व इतर उत्तरसुचक प्रश्नांना त्यांनी नाकारले आहे.

१७. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांनी त्यांच्या सरतपासामध्ये त्यांना साक्षकामी न्यायालयाचा साक्षीसमन्स प्राप्त झाला आहे, त्यांच्या बँकेमध्ये दत्तात्रय सखाराम भोसले यांचे बचत खाते आहे, दिनांक ११/०९/२०२० रोजी दत्तात्रय भोसले यांनी सुरेश माणीक मोरे यांच्या सेंट्रल बँकच्या खात्यामध्ये रुपये २ लाख एन.ई.एफ.टी. द्वारे रक्कम वर्ग केली होती, ते दर्शविण्याकरीता त्यांनी न्यायालयात आर.टी.जी.एस. फॉर्मची पडताळलेली प्रत व वीड्रावल स्लीपची पडताळलेली प्रत दाखल केली आहे, त्यांनी न्यायालयात त्या फॉर्मची व वीड्रावल स्लीपची मुळ प्रत सोबत साक्षीवेळी आणलेली होती, सदर मुळ प्रतींवरुनच सदरच्या पडताळलेल्या प्रती काढण्यात आलेल्या आहेत, त्यांना आर.टी.जी.एस. फॉर्मची पडताळलेली प्रत नि.३६ दाखविण्यात आली, त्यावर खातेदार दत्तात्रय भोसले, बँकेचे लेखणीक कापसे व शाखा प्रमुख अब्दागीरे यांच्या सह्या आहेत, त्यांना अभिलेखावरील वीड्रावल स्लीपची पडताळलेली प्रत नि.३७ दाखविण्यात आली, त्यावर खातेदार दत्तात्रय भोसले यांची सही आहे, तसेच त्यांनी दत्तात्रय भोसले यांच्या खात्याचे अकाऊंट

स्टेटमेंन्ट न्यायालयात दाखल केलेले आहे, दिनांक ११/०९/२०२० ला दत्तात्रय भोसले यांच्या खात्यावरुन सुरेश मोरे यांच्या खात्यावर रक्कम रुपये २ लाख वर्ग झाले आहेत, त्यांना सदरचे अकाऊंट स्टेटमेंन्ट नि.३८ दाखविण्यात आले, त्यावर त्यांची सही आहे व बँकेचा शिक्का आहे, त्यातील मजकुर बरोबर आहे, असे कथन केले आहे.

१८. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये त्या गुणवरे शाखेमध्ये नोव्हेंबर २०२३ पासून कार्यरत आहेत, दिनांक ११/०९/२०२० रोजी त्या सदर शाखेमध्ये कार्यरत नव्हत्या, त्यामुळे जो काही व्यवहार झाला आहे त्याबाबत त्यांना वैयक्तिक माहिती नाही, दिनांक ०९/०९/२०२० रोजी दत्तात्रय भोसले यांच्या खात्यातून रक्कम रुपये २ लाख सुरेश मोरे यांच्या खात्यात वर्ग झाले नव्हते, या बाबी मान्य केल्या आहेत व इतर उत्तरसुचक प्रश्नांना त्यांनी नाकारले आहे.

१९. या प्रकरणात आरोपीने फिर्यादीसोबत त्यांचा जमीनीचा व्यवहार सुरु होता त्याकरीता आरोपीने त्यांना कागदपत्रे दिले होते. त्या कागदपत्रांमध्ये चुकून त्यांचा चेक गेला. आरोपीने फिर्यादीसोबत जमीनीचा व्यवहार न केल्यामुळे त्यांनी सदर चेकचा दुरुपयोग केला, असा बचाव घेतला आहे. सदर खटल्यात दाखल धनादेश आरोपीचा नाही असे आरोपीचे कथन नाही अथवा बचाव नाही. याउलट आरोपीने धनादेश कागदपत्रांमध्ये चुकून फिर्यादीकडे गेला असे कथन केले आहे. त्यामुळे, वादातीत धनादेश व त्यावरील सही आरोपीचीच आहे असे आरोपीने मान्य केले आहे.

२०. या खटल्यात आरोपीला धनादेशावरील सही मान्य आहे. त्यामुळे परक्राम्य लेख अधिनियम कलम १३९ व ११८ ची गृहितके आकर्षित करणेस फिर्यादी यशस्वी झालेला आहे. आरोपीने घेतलेल्या बचावानुसार सदर खटला फिर्यादीने खोटा दाखल केलेला आहे. हे सिध्द करण्याची जबाबदारी कलम १०३ भारतीय पुरावा कायदा, १८७२ नुसार आरोपीची आहे. तसेच मा.नामदार सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडा **रंगप्पा वि. श्री मोहन (2010 ALL SCR 1349)** या निर्णयानुसार मा. नामदार सर्वोच्च न्यायालयाने म्हटल्यानुसार आरोपीवर त्याने मांडलेला बचाव सिध्द करणे बंधनकारक आहे.

२१. बचावासाठी आरोपीने स्वतःची साक्ष नोंदविलेली नाही. फिर्यादीने आरोपीस सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा फलटण येथे आरोपीच्या खात्यावर आरटीजीएसद्वारे रक्कम रु.२,००,०००/– पाठविली हे दाखविण्याकरीता नि.३ अ.क्र.१० अन्वये फिर्यादीचा खातेउतारा दि.०१.०९.२०२० ते दि.३०.०९.२०२० पर्यंतचा दाखल केलेला आहे. नि.३८ वरुन असे दिसून येते की, फिर्यादीच्या खात्यात रक्कम रु.५,००,०००/– जमा झाल्यानंतर दि.११.०९.२०२० रोजी एनईएफटीद्वारे रु.२,००,०१८/– अकाऊंट नं.३९०८१८४२८१ मध्ये पाठविल्याचे दिसून येते व ती रक्कम फिर्यादीच्या खात्यातून वजा झाल्याचे दिसून येते. साक्षीदार क्र.२ यांच्या पुराव्यावरुन सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, सातारा, शाखा गुणवरे मध्ये फिर्यादीचे बचत खाते आहे. दि.११.०९.२०२० रोजी फिर्यादीने आरोपीच्या सेंट्रल बँक खात्यामध्ये रु.२,००,०००/– एनईएफटीद्वारे वर्ग केली होती. त्या संदर्भाचा आरटीजीएस फॉर्म नि.३६, विथड्रॉवल स्लीप नि.३७, तसेच, नि.३८ फिर्यादीचे अकाऊंट स्टेटमेंटही कागदपत्रे शाबित होतात. नि.३६ वरुन असे दिसून येते

की, दि.११.०९.२०२० रोजी फिर्यादीच्या खात्यातून आरोपीच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा फलटण मधील खाते नं.३९०८१८४२८१ मध्ये रु.२,००,०००/– व कमिशन रु.१८/– अशी एकुण रु.२,००,०१८/– एनईएफटीद्वारे पाठविण्यासाठी फिर्यादीने एनईएफटीचा फॉर्म त्यांच्या बँकेला भरुन दिला. तसेच, त्यासंदर्भाची विथड्रॉवल स्लीप नि.३७ फिर्यादीने त्याचदिवशी भरुन त्याची सही करुन दिली. त्यामुळे, फिर्यादीचा तोंडी पुरावा व नि.३६ ते ३८ वरुन फिर्यादीने त्याच्या खात्यातून आरोपीला रु.२,००,०००/– एनईएफटीद्वारे दि.११.०९.२०२० रोजी पाठविले व ती रक्कम आरोपीच्या खात्यात वर्ग झाली ही बाब शाबित होते. याव्यतिरिक्त फिर्यादीने त्यांच्या सरतपासामध्ये रोख स्वरुपात त्यांनी रक्कम रु.२५,०००/– आरोपीस दिले असे कथन केलेले आहे. ती बाब आरोपीने नाकारली असली तरी आरोपीला रक्कम रु.२,२५,०००/– मिळाली नव्हती याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा आलेला नाही. फिर्यादीने जरी त्याच्या फिर्यादीत आणि सरतपासाचे प्रतिज्ञापत्रात दि.०९.०९.२०२० रोजी आरोपीस एनईएफटीद्वारे रक्कम पाठविल्याचे कथन केले असले तरी अभिलेखावर आलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन दि.११.०९.२०२० रोजी आरोपीच्या खात्यात रु.२,००,०००/– वर्ग झाले ही बाब शाबित होते. त्यामुळे, केवळ दिनांकामध्ये बदल झाला म्हणून आरोपीला रक्कमच मिळाली नाही असे होत नाही व आरोपी त्या जबाबदारीतून मुक्त होवू शकत नाही.

२२. फिर्यादीने तो धनादेश दि.२३.०७.२०२२ रोजी जमा केला त्यावेळी आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नाही म्हणून तो रिटर्न मेमोसह परत आला. त्यानंतर फिर्यादीने पुन्हा तो धनादेश वटणेकामी टाकला असता दि.०६.०८.२०२२ रोजी तो आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नाही म्हणून न वटता परत आला. सदर बाब फिर्यादीने आरोपीस कळविल्याचे व आरोपीने पुन्हा चेक बँकेत भरल्याचे फिर्यादीस सांगितले असे शपथेवर कथन केलेले आहे. त्यामुळे, फिर्यादीने पुन्हा एकदा जमा केल्यानंतर दि.१२.०८.२०२२ रोजीच्या मेमोने तो आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नाही म्हणून न वटता परत आला. तसेच जर आरोपीचा चेक फिर्यादीकडे कागदपत्रांमध्ये चूकून गेला असे गृहीत धरले तरी आरोपीला फिर्यादीने तीन वेळेस धनादेश त्याच्या खात्यात टाकल्याची माहिती व त्याच्या खात्यातून न वटता परत गेल्याची माहिती बँकेतून मिळूनही त्याने बँकेला पेमेंट स्टॉप करण्याबाबत सुचना का दिल्या नाहीत अगर त्याचा चेक गहाळ झाल्याबाबत पोलीस स्टेशनला तक्रार का केली नाही, व फिर्यादीने आरोपीच्या खात्याचा चेक तीनदा त्याच्या खात्यात जमा करेपर्यंत आरोपी गप्प का राहिला याचा खुलासा करण्यात आलोला नाही. तसेच फिर्यादी आणि आरोपीमध्ये कोणत्या जमीनीचा व्यवहार सुरु होता व त्यांनी कोणती कागदपत्रे फिर्यादीस दिली होती याचाही खुलासा आरोपीने केलेला नाही. त्यामुळे आरोपीने घेतलेला बचाव विश्वासार्ह वाटत नाही. तसेच, सदर बचाव हा आरोपीविरुध्द असलेले गृहीतके खोडून काढण्यास पुरेसा नाही. आरोपीने त्याच्या बवाचाप्रित्यर्थ कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. पुराव्याअभावाी आरोपीने घेतलेल्या बचावात मला काही तथ्य आढळून येत नाही.

२३. याउलट फिर्यादीने त्याच्या खात्यात दि.११.०९.२०२० रोजी आरोपीला रु.२,००,०००/– एनईएफटीद्वारे पाठविली ती रक्कम आरोपीच्या खात्यात वर्ग झाली तसेच रोख रु.५०,०००/– फिर्यादीने आरोपीस दिले या बाबी फिर्यादीने व साक्षीदार क्र.२ यांच्या तोंडी पुरावा

तसेच, कागदोपत्री पुराव्यावरुन शाबित झालेले आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष 'नाही' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीता :–**

२४. आरोपीने दिलेला नि.२३ धनादेश दि.२३.०७.२०२२ रोजी सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक लि.सातारा, शाखा गुणवरे या त्यांच्या खात्यामध्ये भरला असता तो न वटता दि.२६.०७.२०२२ रोजी आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नाही म्हणुन नि.२४ चेक रिटर्न मेमो व दि.३०.०७.२०२२ रोजी फिर्यादीच्या बँकेचे कव्हरिंग लेटर नि.२५ सोबत परत आला. त्यामुळे फिर्यादीने पुन्हा सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक लि.सातारा, शाखा गुणवरे या त्यांच्या खात्यामध्ये भरला असता तो न वटता दि.०४.०८.२०२२ रोजी आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नाही म्हणुन नि.२६ चेक रिटर्न मेमो व दि.०६.०८.२०२२ रोजी फिर्यादीच्या बँकेचे कव्हरिंग लेटर नि.२७ सोबत परत आला. त्यामुळे फिर्यादीने पुन्हा सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक लि.सातारा, शाखा गुणवरे या त्यांच्या खात्यामध्ये भरला असता तो न वटता दि.१२.०८.२०२२ रोजी आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नाही म्हणुन नि.२८ चेक रिटर्न मेमो व दि.०६.०८.२०२२ रोजी फिर्यादीच्या बँकेचे कव्हरिंग लेटर नि.२९ सोबत परत आला. त्यांनंतर फिर्यादीने त्यांच्या वकीलामार्फत आरोपीस दि.०२.०९.२०२२ रोजी नि.३० ची नोटीस रजिस्टर पोस्टाने पावतीने पाठविली. ती आरोपीला पोस्टाचा ट्रॅकिंग रिपोर्ट नि.३१ नुसार आरोपीस दि.१४.०९.२०२२ रोजी ती नोटीस मिळाल्याचे दिसून येते. फिर्यादीच्या उलटतपासामध्ये आरोपीस नोटीस पाठविली नाही, ती आरोपीला मिळाली नाही असा बचाव आरोपीने घेतल्याचे दिसून येते. तो बचाव फिर्यादीने नाकारला आहे. तसेच, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे निवेदन नि.४२ मध्ये आरोपीने प्रश्न क्र.८ व ९ यास त्यांना नोटीस मिळाल्याचे नाकारले आहे. आरोपीने जरी त्यास नोटीस मिळाल्याचे नाकारले असले तरी माझ्या समोरील पुरावा नि.३१ वरुन फिर्यादीस या प्रकरणातील धनादेश अनादरीत झाल्यानंतरची नोटीस आरोपीला मिळालेली आहे. तसेच आरोपीला नोटीस मिळुनही त्यांनी फिर्यादीस त्यांची रक्कम आणुन दिलेली नाही ही बाब फिर्यादीने शाबित केलेली आहे. आरोपीने ती बाब नाकारली आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे निष्कर्ष 'होय' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.३ करीता :–**

२५. मुद्दा क्र. १ व २ मध्ये चर्चिल्याप्रमाणे आरोपींनी फिर्यादीच्या हक्कात असलेले कलम १३९ चे गृहितके खोडुन काढलेली नाहीत. तसेच आरोपीने दिलेला धनादेश अनादरित झाल्यानंतर फिर्यादीने आरोपीस नोटीस दिलेली होती व ती आरोपीला मिळालेली आहे. वादातीत धनादेश आरोपीने कायदेशीर देणे देण्यापोटी दिला ही बाब फिर्यादीने सिध्द केलेली आहे. म्हणून आरोपीने कलम १३८ अंतर्गत गुन्हा केला हे सिध्द होत आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. ३ चे निष्कर्ष 'होय' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीता :–**

२६. मुद्दा क्र. १ ते ३ मध्ये चर्चिल्याप्रमाणे आरोपीने सदर कायद्याअंतर्गत कलम १३८ अन्वये गुन्हा केला, हे सिद्ध होत आहे. त्यामुळे मी आरोपींना पराक्रम्य लेख अधिनियम १८८१, कलम १३८ अंतर्गत दोषी धरत आहे.

२७. आरोपीस शिक्षेसंदर्भात कलम १३८ प्रमाणे न्यायालयात अधिकार दिलेले आहेत. सदर तरतुदीनुसार आरोपीस २ वर्षे कारावास किंवा धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट रक्कम देण्याची दंडाची शिक्षा किंवा दोन्हीही शिक्षा न्यायालय देऊ शकते. आरोपी, त्यांचे विधीज्ञ तसेच फिर्यादीचे विधीज्ञ आजरोजी हजर आहेत. फिर्यादी व आरोपीचे शिक्षेविषयी त्यांचे काय म्हणणे आहे हे ऐकण्याकरीता मी येथे थांबत आहे.

**ठिकाण** : फलटण श्रीमती.जे.एस.खेडकर–गोयल,
**दिनांक** : १९.०५.२०२६ **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, फलटण.**

२८. फिर्यादीचे विधीज्ञ श्री.यु.व्ही.कदम यांचे असे म्हणणे आहे की, फिर्यादीने त्याच्या तुटपुंज्या पगारातून व कर्ज काढून घेतलेल्या रक्कमेतून आरोपीस रु.२,२५,०००/– मैत्रीच्या नात्याने अडचणीत दिली होती. ती रक्कम आरोपीने २ वर्षाने दिली नाही. त्याच्या बदल्यात वादातीत धनादेश दिला. तोदेखील तीन वेळेस फिर्यादीच्या खात्यात टाकूनही आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नाही म्हणून न वटता परत आला त्यामुळे, फिर्यादीस आर्थिक, मानसिक त्रास झालेला आहे. प्रकरण प्रलंबित असताना तडजोडीसाठीदेखील प्रकरण पाठविले होते. परंतू, त्यामध्ये आरोपीने तडजोड केली नाही. फिर्यादीस सदर फिर्याद दाखल केल्यानंतर ते आजपावेतो त्याची रक्कम मिळालेली नाही. त्यासाठी त्यास न्यायालयीन खर्च करावा लागला आहे. तसेच, मानसिक व शारिरीक त्रास सहन करावा लागला आहे. त्यामुळे, आरोपीस जास्तीत जास्त कारावासाची शिक्षा तसेच चेक रक्कमेच्या दुप्पट रक्कम दंड करण्यात यावी व ती रक्कम फिर्यादीस नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी.

२९. आरोपीने असे नमूद केले आहे की, त्याच्यावर त्याच्या कुटुंबाची जबाबदारी आहे, तो शेती करतो, त्याची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे, त्याला कारावासाची शिक्षा करु नये, तसेच, कमीत कमी दंड करण्यात यावा.

३०. आरोपीने केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप, धनादेशाची रक्कम, ती रक्कम दि.२६.०७.२०२२ पासून थकबाकी असल्याबाबतचा कालावधी एकूण ३ वर्ष ९ महिने २४ दिवसांचा कालावधी, फिर्यादीचा न्यायालयीन खर्च, खटल्याचा प्रलंबित कालावधी या कालावधीतील आरोपींचे वर्तन, तसेच सन २०२० नंतर ते आजतागायत आरोपींनी फिर्यादीला कोणत्याही रकमेची परतफेड केलेली नाही. त्यामुळे फिर्यादीला प्रचंड आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागला आहे. या सर्व बाबी लक्षात घेता आरोपीला शिक्षेविषयी सहानुभूती दाखविण्याचे कोणतेही कारण मला दिसून येत नाही. तसेच, अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ कलम ४ व ५ मधील तरतूदीनुसार आरोपी हे फायदा मिळण्यास पात्र नाहीत, असे माझे मत आहे.

३१. सदर खटल्यातील वस्तुस्थिती व परिस्थिती पाहता यांच्यामधील व्यवहार हा व्यवसायिक स्वरुपाचा होता. फिर्यादीला त्यामुळे केस प्रलंबित असतांना आयुष्यात आर्थिक नुकसान झाले आहे. आरोपीला शिक्षा देताना फिर्यादीचे आर्थिक नुकसान देखील विचारात घेणे आवश्यक

आहे. त्यामुळे धनादेशाची रक्कम, व्यवहाराची तारीख व बरोबरच मा.सर्वोच्च न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७ खाली वेगवेगळ्या न्यायनिर्णयामध्ये जे मत व्यक्त केले आहे, त्या सर्व बाबींचा विचार करता फिर्यादीला नुकसान भरपाई देणे न्यायोचित होईल व आरोपीने गुन्हा केलेला असल्यामुळे त्यांना शिक्षा देणे आवश्यक आहे. म्हणून, मी मुद्दा क्र.४ करीता खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) प्रमाणे परक्राम्य लेख अधिनियम कायदा, १८८१ कलम १३८ नुसार दंडनिय अपराधाकरीता दोषी ठरविण्यात आले आहे.

२. आरोपीस ५ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व र.रु.५,००,०००/– इतक्या दंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. दंडाची रक्कम न दिल्यास आरोपीने आणखी १ महिना साध्या कारावासाची शिक्षा सलग भोगावयाची आहे.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७ प्रमाणे वसुल दंडातील रक्कमेतून फिर्यादीला र.रु.५,००,०००/– इतकी नुकसान भरपाई म्हणून अपील कालावधी संपल्यानंतर देण्यात यावी.

४. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनकदबे रद्द करण्यात येत आहे.

५. आरोपीस न्यायनिर्णयाची एक प्रमाणित प्रत विनामुल्य देण्यात यावी.

६. आरोपीस सदर न्यायनिर्णयाविरुध्द अपील करण्याची मुभा आहे याची सुचना देण्यात आली. तसेच, त्यांना न्यायनिर्णयाविरुध्द अपील करण्यास मोफत विधी सहाय्य हवे असल्यास तालुका विधी सेवा प्राधिकरण, फलटण **संपर्क क्र.८५९१९०३६११** अगर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा, ५१५, सदर बझार द्वारा जिल्हा न्यायालय इमारतीमागे, सातारा, **फोन ०२१६२–२९८७८४**, ईमेल–**supdtdlsa.satdc-mh@gov.in** यांचेकडे तसेच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण **टोल फ्री हेल्पलाईन क्र.१५१००** आहे याची माहिती दिली आहे.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आला.)

JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL

Digitally signed by JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Date: 2026.05.19 14:55:56 +0530

**ठिकाण** : फलटण
**दिनांक** : १९.०५.२०२६

श्रीमती.जे.एस.खेडकर–गोयल,
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, फलटण.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. A. S. Bagal |
| Court Name | : | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>J.M.F.C., Phaltan |
| Judgment Date | : | 19.05.2026 |
| Judgment signed by Presiding Officer | : | 19.05.2026 |
| Judgment Uploaded On | : | 19.05.2026 |